**(1) Name of the District :** Chandrapur **(2) Date and time of Meeting** : 18.08.2013 at 04.00 P.M. **(3) Place of the Meeting** : F.E.S.College, Chandrapur **(4) Name of the Observers who attended the Meeting. :** (I) Dr. Anil Dhage (II) Dr. Vilas Dhane (III) Prof. Vivek Deshmukh. **(5) Name of the Working Chairman elected by the House.** : Prof. Manik Andhare **(6) The following candidates were declared duly elected by the working Chairman : (I) President :-** Dr. Rajesh R. Kherani, Mehandi Villa, Deshpande Wadi, Behind Police Station, Rajura - 442 905 Ph.No. 07173 -22269 (Mob. No. 9822361165) **(II) Vice-President :** Mrs. Jyoti Pramod Rakhunde, Ramalaya, Borkar Plots, Ram Nagar, Chandrapur. Ph.No. 07172-250477 (Mob. No. 9975649585) **(III) Secretary :** Dr. Purushottam Borkar, S/4, Sriram Prabhu Apartment, Near LTV School, Civil Lines, Chandrapur. Ph.No. 07172-230337 (Mob. No. 9422138756) **(IV) Joint Secretary :** Prof. Vandana Khanke, Plot No. 7. Gurumauli Nagar, Mahakali Ward, Chandrapur Ph.No. 07172-227885 (Mob. No. 9890361071) **( ) Executive Committee Members : (V)** Prof. S. Vinkataramana, Near Vitthal Mandir, Rajura Distt. Chandrapur. Ph.No.7173-223585 (Mob. No. 9403302908) **(VI)** Dr. Sham H. Moharkar, Srikrupa Colony, J.B.Nagar, Chandrapur Ph.No. 07172-253539 (Mob. No. 9422909880) **(VII)** Prof. Gajanan J. Bansod, Behind Gurudeo Mangal Karyalaya, Wadala (P) Chimur Dist. Chandrapur-442 903. Ph.No. 07170-230712 (Mob. No. 9423419393) **.**

## (12)

**(1) Name of the District** : Buldana **(2) Date and time of Meeting** : 25.08.2013 at 11.00 A.M. **(3) Place of the Meeting** : Mukul Wasnik Vidhi College, Bulhana. **(4) Name of the Observers who attended the Meeting. :** (I) Prin. S.T.Sangle (II) Prof. V.S. Deshmukh. (III) Dr. B.T.Gawande (IV) Prof. N.V.Changole **(5) Name of the Working Chairman elected by the House.** : Prof. P.H.Pathak **(6) The following candidates were declared duly elected by the working Chairman : (I) President :-** Dr. Madhukar B. Sonune, Khandala Road, Gajanan Nagar, Chikhali Distt. Buldana. (Mob. No. 9422218515) **(II) Vice-President :** Prof. Kailas B. Ingle, Bhagwan Baba College, Lonar, Dist. Buldana. (Mob. No. 9420149296) **(III) Secretary :** Prof. Kailas K. Pawar, Janta Mahavidyalaya, Malkapur, Dist Buldana (Mob. No. 9422939414) **(IV) Joint Secretary :** Prof. Subhash G. Raut, S.P.M. Arts. & Com. College, Chikhali, Dist. Buldana (Mob. No. 9421390326) **( ) Executive Committee Members : (V)** Dr. Ramesh T. Parihar, Laxmi Nagar, Malkapur, Distt. Buldana (Mob. No. 9421468997) **(VI)** Prof. Satish G. Joshi, Balaji Galli, Sindkhed Raja Dist. Buldana. (Mob. No. 9975287291) **(VII)** Prof. Mrs. Seema V. Deshmukh, Sumeet Apartments, Deshmukh Plot, Khamgaon, Dist. Buldana. (Mob. No. 9423721210) **.**

*दिनांक १ जानेवारी, २०१३ ते दि. ३० एप्रिल २०१३ या कालावधीतील निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीनेतनावरील महागाई वाढीची थकबाकी देण्याबाबत*

### *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग : शासन निर्णय क्रमांक : निमवा-२०१३/प्र.क्र.४२/सेवा-४*

*मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२*

**तारीख : ०८ जुलै, २०१३**

**वाचा :** शासन निर्णय क्रमांक : निमवा-२०१३/प्र.क्र.४२/सेवा-४,दिनांक २२ मे, २०१३

### *शासननिर्णय*

संदर्भाधिन दिनांक २२ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय निवृत्तीनेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तीवेतन/महागाई कुटूंब निवृत्ती वेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. ०१ जानेवारी, २०१३ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ७२ टक्के वरून ८० टक्के करण्यात आला आहे. सदर महागाई वाढीची रक्कम दि. ०१ मे, २०१३ पासून रोखीने देण्यात आली आहे.

२. शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटूंबनिवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या मुळ निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तीवेतन/महागाई कुटुंब निवृत्ती वेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. ०१ जानेवारी, २०१३ ते दि. ३० एप्रिल, २०१३ या कालावधीतील महागाई वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.

३. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारासह, लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थामध्ये/स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्विकारलेली आहे, व जे निवृत्तावेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - निअंक १०९९/३०६/सेवा-४. दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचाऱ्यांनाही, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १००१/५०/सेवा-४, दिनांक ९ एप्रिल २००१ च्या तरतुदीनुसार त्याच्या पूर्ण निवृत्तीवेतनावर, वरील परिच्छेद -१ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

७. या संबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमुद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षातर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तीवेतनावरील महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, योग्य त्या फेरफारांसह, आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३०७०८१३१००५१६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHOSALE SATISH H — Digitally signed by Bhosale Satish H
DN : c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postal Code=400 032, st=Maharashtra, cn=Bhosale Satish H
Date : 2013.07.08 13:12:26+05'30'

**(स.ह.भोसले)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

# डॉ. दाभोळकर !
# 'आधुनिक' महाराष्ट्राला क्षमा करा

**प्रा.बी.टी.देशमुख,** *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**सभागृहात आणि सभागृहाबाहेर सतत आश्वासने देऊन त्यांची प्रत्यक्षात अम्मलबजावणी न करण्याच्या राज्य शासनाच्या अवगुणाचा फार मोठा फटका अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याच्या निर्मितीला बसला हे दुर्दैव होय.** याबाबत सभागृहाच्या पातळीवर घडलेल्या घटनांचा मी अत्यंत जवळचा साक्षीदार आहे. हा फटका किती जबरदस्त होता याची जाणीव साऱ्या महाराष्ट्राला डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या दुःखद अशा निषेधार्ह हत्येनंतरच व्हावी हे तर आणखीच दुर्दैवी होय.

**२.** सन १९९२ ते १९९८ या काळात आम्हा सहा-सात शिक्षक प्रतिनिधींचा विधानपरिषदेत एक अत्यंत प्रभावी गट कार्यरत होता. आम्ही सारेच शिक्षक चळवळीत काम करीत सभागृहामध्ये पोहचलो होतो. शिक्षक चळवळीच्या सोबतच कुणी अनुशेष निर्मूलनाच्या चळवळीमध्ये, कुणी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीमध्ये तर कुणी राष्ट्रसेवा दलाच्या चळवळीमध्ये आपापल्या आवडीनुसार सभागृहाबाहेर कार्यरत होतो.

**३.** मराठवाडा शिक्षक मतदार संघातून विधानपरिषदेवर निवडून आलेले श्री. पी.जी.दस्तुरकर हे शिक्षक चळवळीत अनेक वर्षे कार्यरत होते. मराठवाडा शिक्षक संघाचे ते महत्वाचे पदाधिकारीही होते. मराठवाड्याच्या विकासाच्या चळवळीमध्ये ते सक्रिय होते. त्याच बरोबर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामामध्ये त्यांचे खुपच सक्रिय योगदान होते. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नांदेड जिल्हा शाखेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते. विधानपरिषदेत सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन कायदा झाला पाहिजे यासाठी सभागृहामध्ये अशासकीय ठराव मांडावा असा त्यांनी विचार केला व त्याप्रमाणे त्यांनी ठरावाची नोटीस दिली तो ठराव पुढील प्रमाणे होता. :- "राज्यातील अनेक भागात विशेषतः ग्रामिण भागात, मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धेच्या नावाखाली संधीसाधू आणि भोंदूबुवांकडून गरीब-अशिक्षित स्त्री पुरूषांची होत असलेली पिळवणूक थांबविण्यासाठी व अंधश्रद्धा पसरविणाऱ्या विरूद्ध कठोर कारवायी करण्यासाठी शासनाने अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करावा **अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."**

**४.** "**अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करणे**" या विषयावरील श्री.पी.जी.दस्तुरकर यांचा ठराव शुक्रवार, दिनांक ७ जुलै १९९५ रोजी सभागृहात चर्चेसाठी आला. श्री. दस्तुरकर यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची याबाबतची भूमिका सभागृहामध्ये अतिशय तपशीलाने व ठामपणे मांडली व आपला ठराव मान्य करावा अशी सभागृहाला विनंती करून त्यांनी आपले भाषण थांबविले. **सर्व बाजूंच्या निरनिराळ्या आठ सदस्यांनी या ठरावावर भाषणे केलीत. त्यापैकी प्रत्येकाने श्री. दस्तुरकर यांच्या ठरावाला पाठिंबा दिला. एकानेही एका शब्दानेसुद्धा त्यांच्या ठरावाला विरोध केला नाही.** विचारपूर्वक ठराव मांडायचा व एकदा अशासकीय ठराव मांडल्यानंतर तो मोघम आश्वासनावर मागे घ्यायचा नाही. "**अमुक एका मुदतीत कायदा करू**" असे ठाम आश्वासन मिळाले तरच ठराव मागे घेण्याचा विचार करावयाचा हे आमच्या शिक्षक गटाचे ठरलेले ठाम धोरण होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यपातळीवरील पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून श्री. दस्तुरकर यांनी तो ठराव मांडलेला असल्याने ते त्याबाबत अत्यंत आग्रही होते.

**५.** मा. समाज कल्याणमंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले. आपल्या मोघम भाषणाचा शेवट त्यांनी पुढील वाक्याने केला : "**आपण व्यक्त केलेल्या विचारांशी शासन पूर्णपणे सहमत असून माननीय सदस्यांनी हा ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.**" त्यांच्या या उत्तरातील "आपल्या विचाराशी शासन पूर्णपणे सहमत आहे" हे वाक्य आनंददायक असले तरी कायद्याचा मसुदा किती दिवसात शासनाच्या वतीने सभागृहात मांडला जाईल याबाबत ते एक शब्द बोलत नव्हते. त्यामुळे दस्तुरकर यांनी एकदम उठून "**ही विनंती मला मान्य नाही**" असे सांगितले व पुन्हा २-३ मिनिटे आपली बाजू मांडली व शेवटी "आपण हा कायदा करीत आहोत असे सांगून हा ठराव संमत करावा. **किंवा इतक्या दिवसात हा कायदा करू अशी मुदत आम्हाला सांगावी.**" अशी स्पष्ट व ठाम मागणी केली.

**६.** पुढे हे शब्दयुद्ध २०-२२ मिनिटे चालले. दोन-दोन, तीन-तीन वाक्यांचा अनेक सदस्यांचा सहभाग या चर्चेत समाविष्ट झाला. समाजकल्याण मंत्री म्हणाले. "**सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन लवकरात लवकर हा कायदा करू.** तेव्हा कृपया माननीय सदस्यांनी हा ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो." पुन्हा "**लवकरात लवकर**" अशी शब्दरचना वापरल्यामुळे दस्तुरकरांनी ठराव मागे घेण्यास नकार दिला. तेंव्हा मा. उपमुख्यमंत्री यांनी पुढील प्रमाणे आश्वासन दिले. :- "आपल्या भावनांचा आदर केला आहे. **नजिकच्या काळात शासन असा कायदा आणू इच्छिते. याबाबत शासनाची भूमिका स्वच्छ आहे.** म्हणून मी मा. सदस्यांना विनंती करतो की, शासनाची याबाबतची भूमिका लक्षात घेऊन आपण हा प्रस्ताव मागे घ्यावा." "लवकरात लवकर" या शब्दाऐवजी "**नजिकच्या काळात**" या शब्दाला दस्तुरकर 'बळी' पडत नाहीत हे लक्षात आल्यावर **मा. उपमुख्यमंत्री पुन्हा म्हणाले :- "अध्यक्ष महाराज मी अंधश्रद्धेसंबंधी कायदा करण्याचे आश्वासन देतो. अंधश्रद्धा निर्मूलन**

---

*(सहपत्र एक : परिच्छेद १२ पहा)*

### *यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई*

**जावक क्र. यचप्र/२००२ : दिनांक १३ जून २००२**

प्रति,

**श्री. नरेंद्र दाभोळकर,** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती,
सदाशिव पेठ, सातारा.

**विषय :** अंधश्रद्धा निर्मूलन समिती विधेयकाबाबत...

महोदय,

काल दिनांक १२ जून २००२ रोजी आपण दूरध्वनीवरून दिलेल्या निरोपाप्रमाणे वरील विषयावरील सादर केलेल्या विधेयकासंबंधीच्या झेरॉक्स प्रती सोबत पाठवित आहे. **तसेच मा. आमदार बी.टी.देशमुख यांनाही एक प्रत पाठवित आहे.** कळावे.

आपला
(त्र्यं.भा. खेडकर) संचालक, प्रशासन

**प्रत माहितीसाठी : मा. आमदार बी.टी.देशमुख यांना वरील साहित्याच्या प्रतिसह सादर.**

---

*(सहपत्र दोन : परिच्छेद १३ पहा)*

**प्रा.बी.टी.देशमुख,** मुंबई/नागपूर
*विधान परिषद सदस्य,* क्रमांक : एलसीआर/१०७/१
दिनांक : १५.७.२००२

प्रति,
**मा. सभापती महोदय**

**विषय :-** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन अधिनियम २००२ मांडण्यास अनुमती.

**संदर्भ :-** महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०७

संदर्भामध्ये नमुद केलेल्या नियमानुसार विषयोक्त बाबीवरील अशासकीय विधेयक मांडण्यास आपली अनुमती असावी ही विनंती. विधेयकाची एक प्रत, उद्देश व कारणे याबाबतचे निवेदन सोबत जोडले आहे.

**बी.टी.देशमुख**
विधान परिषद सदस्य

**सहपत्र** - पृष्ठ १ ते ३२

**सन २००२ चे विधान परिषद विधेयक क्रमांक....**

श्रद्धेपोटी, देवदेवतांच्या नावावर लोकांना लुबाडणे, स्त्रियांशी अनैतिक संबंध ठेवणे, अनैतिक चाळे करणे, बुवाबाजीच्या नावाखाली स्त्रियांना शीलभ्रष्ट करणे, देवीबाजीच्या नावाखाली पुरुषांशी अनैतिक संबंध ठेवणे, घाणेरडे चाळे करणे, संताचे व थोर पुरुषांचे नाव बदनाम करणे, धर्माच्या नावावर लैंगिकता, भ्रष्टाचार व अंधश्रद्धा निर्माण करणे, पसरविणे, आणि त्यावर लोकांना फसविणे व हानी पोहोचविणे या व अशा इतर हानीकारक गोष्टींवर किंवा कृत्यावर बंदी घालून सामाजिक स्वास्थ निर्माण करण्याकरिता विधेयक.

**झाले पाहिजे व तसा कायदा करणे मान्य केले आहे.**" मुदतबंद आश्वासन नसल्यामुळे दस्तुरकरांनी ठराव मागे घेण्यास नकार दिला व मतदानाची मागणी केली. मा. सभापतींनी ५ मिनिटांची "डीव्हीजन बेल" वाजविण्यास सुरुवात करायला सांगितले व बेल संपताच "**आता सदनाचे दरवाजे बंद करण्यात यावेत. नवीन सदस्य कोणीही आत येणार नाही.**" अशी आज्ञा केली. पुढच्या ४-५ मिनिटात मतमोजणी संपल्यानंतर **मा. सभापतींनी "विभाजनाचा निकाल असा आहे :- अनुकूल : २३, प्रतिकूल : ६. ठराव संमत झाला.**" असे जाहिर केले. आता हा कोण्या मंत्र्याने आश्वासन देण्याचा प्रश्न राहिला नव्हता तर तो सभागृहाचा ठराव झाला होता. **मा.मंत्र्यांनी मत अनुकूल दिले, उपमुख्यमंत्री अनुकूल बोलतात. सभागृहात ठराव सम्मत होतो पण या घटनेला १८ वर्षे झाली तरी त्याबाबत काहीच होत नाही हे जे डॉ. नरेंद्र दाभोळकर वारंवार म्हणत होते. ती घटना जशी घडली तशी वर दिलेली आहे.**

**७.** पुढच्या वर्षा दोन वर्षात याबाबत शासनाने काहीही कारवायी केली नाही. काळ भराभर निघून जातो. सन १९९९-२००० च्या दरम्यान शासन बदलले. लोकशाही आघाडीचे सरकार आले. ते बहुपक्षीय सरकार असल्याने त्या सर्व पक्षांना मान्य होईल असा एक किमान कार्यक्रम या सर्व पक्षांच्या समितीने तयार केला. प्रा. एन.डी.पाटील हे या समितीचे अध्यक्ष होते. या किमान कार्यक्रमात "**हे शासन सत्तेवर आल्यानंतर एक वर्षाच्या आत उघड अंधश्रद्धांना प्रतिबंध करणारा कायदा करेल**" असे स्पष्टपणे नमूद आहे. अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे हे मोठे यश होते, हे खरे असले तरी त्यामुळे एक वर्ष वाट पहाणे भाग होते. पुढच्या एक वर्षात काहीही वाटचाल झाली नाही.

**८.** सन २००१ निघून गेले. सन २००२ सुरु झाले पण आश्वासन दिल्याप्रमाणे कोणतीही कारवाई होत नव्हती. तेव्हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दिनांक ६ ऑगस्ट २००२ रोजी "**विधिमंडळासमोर धरणे**" आंदोलनाचा कार्यक्रम जाहिर केला. याबाबतची नोटीस महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष या नात्याने डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी राज्याचे मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अध्यक्ष, विधानसभा, व सभापती, विधानपरिषद यांना दिली.

**९.** सन २००२ च्या सुरुवातीला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने एका बाजूला ६ ऑगस्ट २००२ ला धरणे आंदोलन कार्यक्रम जाहिर केला असतांनाच दुसरा एक कार्यक्रम हाती घेतला व तो म्हणजे **अशासकीय विधेयक सभागृहामध्ये दाखल करण्याचा.** मोठमोठी आश्वासने देऊन सत्ताधारी पक्ष काहीच करायला तयार नाही तेव्हा एखाद्या सदस्यांने अशासकीय विधेयकाची नोटीस द्यावी असे समितीने ठरविले. श्री.पी.जी.दस्तुरकर यांचा विधानपरिषदेचा कार्यकाल संपुष्टात आलेला होता. त्यांचा मला एक दिवस अचानक फोन आला. ते म्हणाले "बी.टी.भाऊ! अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत अशासकीय ठराव आपल्या सभागृहात सम्मत झाला होता हे तुम्हाला ठाऊक आहेच. आता आमच्या समितीने अशासकीय विधेयक दाखल करण्याचे ठरविले आहे. बी.टी.देशमुख हे काम अतिशय आनंदाने स्वीकारतील व समर्थपणे पार पाडतील असे मी माझ्या सहकाऱ्यांना सांगीतले आहे".

**१०.** श्री. दस्तुरकर हे यापूर्वी ६ वर्षे सभागृहात सदस्य होते. माझे अतिशय निकट सहकारी या नात्याने त्यांना माझे विचारही जवळून माहित होते. मी त्यांना म्हणालो "दस्तुरकर मी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारेन हे जे तुम्ही सांगितले ते बरोबर आहे. पण 'ही' जबाबदारी मी समर्थपणे पार पाडीन या तुमच्या म्हणण्याला काही अर्थ नाही. कारण अंधश्रद्धा निर्मूलनाबाबतची सर्वसाधारण माहिती इतरांइतकीच किंबहूना थोडी जास्तसुद्धा मला असली तरी यावर अशासकीय विधेयकाचा मसुदा इतक्या तातडीने तयार करण्याची क्षमता माझ्यामध्ये आहे असे तुम्ही गृहित धरणे बरोबर नाही. विशेषतः संज्ञांच्या व्याख्या, आरोपांचे निश्चितीकरण, शिक्षेच्या तरतुदी, तपासाचे तपशील या प्रत्येक बाबीचे विशदीकरण ही तांत्रिक बाब असते व चार चौघा तज्ञांची मदत घेऊन हे काम करतो म्हटले तरी त्याला खूप वेळ लागतो" त्यावर दस्तुरकर ताबडतोबच असे म्हणाले की "त्याची तुम्ही बिलकुल काळजी करु नका. आमच्या जवळ विधेयकाचा मसुदा, उद्देश व कारणांच्या निवेदनासह तयार आहे. हे घ्या, डॉक्टरसाहेबांशी बोला."

**११.** एवढे बोलून दस्तुकरांनी फोन डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या हाती दिला. डॉ. दाभोळकर म्हणाले "बी.टी.सर, विधेयकाचा मसुदा तयार आहे. तो अत्यंत तज्ञ व्यक्तींनी तयार केलेला आहे. ६ ऑगस्टच्या धरणे आंदोलनाची आम्ही चांगली तयारी करीत आहोत. अशासकीय विधेयक दाखल झाल्यास चळवळीला बळ मिळेल" फोनवरच्या या संभाषणात डॉ. दाभोळकरांनी निवृत्त न्यायमूर्ती मा.श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये स्वतः दाभोळकर, मा. श्री. मधुकरराव चौधरी, दादासाहेब रुपवते, माजी विधानमंडळ सचिव श्री. भास्करराव शेटे. माजी विधीसचिव श्री. पवार, बॅरीस्टर राजा भोसले यांचा समावेश होता व या समितीने अतिशय मेहनतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे झालेल्या बैठकीत हा मसुदा तयार केला आहे, असे सांगितले. सोबतच मुंबईस्थित माजी विधीसचिव श्री. पवार यांच्याशी व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे कार्यरत असलेले त्यांचे सहकारी श्री. खेडकर यांच्याशी मी लगेच फोनवर बोलतो व मसुदा तुमच्याकडे पाठविण्याची व्यवस्था करतो, असेही सांगितले. फोनवरून झालेल्या बोलण्यात मी त्यांचे आभार मानले व "माझ्यासाठी हा आनंदाचा विषय आहे. विधानमंडळ सदस्य म्हणून कोणतीही जबाबदारी असली तरी हक्काने मी आपल्या समितीचा सदस्य समजून माझ्याकडे सोपवित चला" असे त्यांना सांगितले.

**१२.** अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामामध्ये त्यांनी किती जीव ओतला होता व त्यासाठीच्या संघटनेची बांधणी किती मजबूतपणे केली होती. याचा प्रत्यय पुढील २-४ दिवसातच मला आला. कारण त्यांनी सांगितल्याप्रमाणे श्री.

*(सहपत्र तीन : परिच्छेद १६ पहा)*

## *महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती*

विज्ञान निर्भयता नीती

*१५५, सदाशिव पेठ, सातारा ४१५००१ : फोन (०२१६२) ३२३३३*

### *नरेंद्र दाभोळकर, कार्याध्यक्ष*

मा. आ. देशमुख, सादर नमस्कार.

आपण अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याबाबत आवाज उठवणार आहात यावद्दल मी आपला अतिशय आभारी आहे. यासंबंधात संबधीतांना पाठवलेल्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. **६ ऑगस्टचे धरणे चांगले होईल यासाठी सर्वतो प्रयत्न करत आहे.** या कायद्याची गरज स्पष्ट करणाऱ्या तीन घटनांचे वर्णन करणारे लेख सोबत पाठवले आहेत. त्याबाबत थोडक्यात मुद्दे असे.

(१) कुशेरे (जि. कोल्हापूर) येथे काही महिने लक्षावधी लोकांच्या डोळ्याशी क्रुर खेळ खेळला गेला. तिच बाब पार्वती माँ प्रकरणात घडली आणि अस्लम ब्रेडवाला प्रकरणातही अशीच मोठी फसवणूक झाली. लेख वाचल्यावर आपणास तपशीलात सर्व लक्षात येईल. **कुशेरे येथे कोल्हापूरातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही. ती चळवळीच्या प्रभावाने साताराला झाली. पार्वती माँ प्रकरणात तर असंख्य बायकांची विदारक फसवणूक झाली. अस्लम ब्रेडवाला देखील सहीसलामत निसटून गेला. त्यावरही कोणतीही कारवाई झाली नाही. थेट कायदा हे सर्व टाळू शकला असता.**

(२) अजूनही ग्रामिण भागात देव घालणे, करणी, भानामती यांची भिती, दहशत आहे. अनेक ग्रामीण भांडणांचे मूळ या प्रकारात आहे. **प्रबोधनाने वा शिक्षणाने या अंधश्रद्धा जाण्यास वेळ लागणारच. तोपर्यंत यातील शोषण रोखण्यास कायदा हवा, आज पोलीस अधिकारीही या प्रकाराकडे ही आमच्याशी संबंधीत बाब नाही असे बघतात. कायद्यामुळे त्यांना या प्रकरणाची नेमकी व त्वरीत दखल घ्यावी लागेल.**

(३) २००० सालापर्यंत सर्वांना आरोग्य ही शासनाची घोषणा होती. ती हवेतच राहिली. **आरोग्यातील अधिक महत्वाचा भाग मानसिक आरोग्याचा आहे.** त्यावद्दल तर आपल्याकडे सर्वच वानवा आहे. मानसिक आरोग्याच्या अभावातून व अज्ञानातून अंगात येणे भूताने झपाटणे असे अनेक प्रकार. शोषण फसवणूक घडते. **याबाबतही सध्या कायदा नसल्याने पोलिस असमर्थता व्यक्त करतात. कार्यकर्ते हतबल ठरतात. यासाठी कायदा हवा.**

(४) कायद्याचे प्रारुप आपणास निवृत्त कायदा सचिव श्री पवार यांनी पाठवले आहेच.

(५) आपण कळवल्यास मी आणखी माहिती देऊ शकेन. आवश्यक असल्यास मुंबईस येऊन भेटण्याचा प्रयत्न करेन.

पुनःश्च एकदा सहकार्याबद्दल धन्यवाद

आपला नम्र

**नरेंद्र दाभोळकर**

अन्य कोणा आमदारांना विनंती करावयाची असल्यासही कळवावे.

खेडकर यांनी त्या मसुद्याच्या जादा झेरॉक्स प्रती या निमित्ताने काढल्या. त्याची एक प्रत माझेकडे मॅजेस्टिक मधील माझ्या मुंबई येथील निवासस्थानी पाठविली व तसे दाभोळकरांना पत्राद्वारे कळविले व त्या पत्राची प्रत सुद्धा माझेकडे पाठविली. ते पत्र मी ***सहपत्र : एक*** म्हणून सोबत दिलेले आहे.

**१३.** अंधश्रद्धा निर्मूलन विधेयकाचा अतिशय तज्ञ व्यक्तींनी तयार केलेला मसुदा आता माझ्या सुपूर्द करण्यात आला होता. सभागृहाचा सदस्य या नात्याने अशासकीय विधेयकाची नोटीस देणे एवढेच एक लहानसे काम माझ्यासाठी आता शिल्लक उरलेले होते. नियमांची निट माहिती करुन घेऊन पुढच्या आठ, पंधरा दिवसामध्ये मी ते काम पार पाडले. दिनांक १५ जुलै २००२ रोजी याबाबत मी दिलेली नोटीस ***सहपत्र : दोन*** म्हणून सोबत दिलेली आहे.

या विधेयकाचे दीर्घ शीर्षक सहपत्र दोनमध्ये तळाशी दिले असून लघुशीर्षक **"महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन अधिनियम"** असे होते. सादर केलेल्या या विधेयकांत चार प्रकरणे व त्यात एकूण २७ कलमे होती. दोन परिशिष्टे होती. परिशिष्ट 'अ' मध्ये पहिल्या क्रमांकावर "(१) भानामती करणे" व पन्नासाव्या क्रमांकावर "(५०) मंत्रतंत्राने स्त्रियांना संतती मिळवून देण्यासाठी किंवा मुलगा होण्यासाठी ढोंग करणे" अशा दर्जाच्या निरनिराळ्या ५० अपराधांचा समावेश होता. मला येथे हेही नमूद केले पाहिजे की अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने व तांत्रिक बाबी सांभाळून हे विधेयक तयार करण्यात आलेले होते. मी ते विधेयक सादर केलेले असले तरी त्यामध्ये माझे बौद्धिक श्रम निरंक होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अनेक वर्षाच्या मेहनतीचे ते फळ होते. माझी भूमिका "मी तो हमाल भार वाही" एवढीच व अशीच होती.

**१४.** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने **बाहेर आंदोलनाचा जोर वाढविल्यामुळे व सत्ताधारी पक्षांच्या किमान कार्यक्रमात असे विधेयक आणण्याची कबूली असल्यामुळे काही अदल बदल करुन शासनातर्फेच नंतर असे विधेयक आणण्यात आले. विधानसभेत ते मंजूर सुद्धा झाले. विधानपरिषदेमध्ये ते विधेयक आल्यानंतर तेथून ते उभय सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले.** विधानपरिषदेने या संयुक्त चिकित्सा समितीवर एक सदस्य म्हणून माझी निवड केली होती. सभागृहाचा सदस्य असेपर्यंत मी त्या समितीचा सदस्य होतो व त्या समितीच्या प्रत्येक बैठकीला हजर होतो. पुढच्या साऱ्या घटनाक्रमाचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे. पण त्या सर्व घटनाक्रमांचे तपशील नमूद करतो म्हटले तर ते २-४ लेखात आवरणारे काम नाही, हे एक व दुसरे म्हणजे अशा लिखाणासाठी आजची वेळही योग्य नव्हे. मात्र एक गोष्ट नमूद केली पाहिजे की **५ वर्षापूर्वी चारही बाजूने पंढरपूरच्या दिशेने येत असलेल्या वारकऱ्यांच्या समुहावर हजारो पत्रकांचा पाऊस पाडण्यात आला व त्यातून "पुढच्या वर्षी वारीला आलात तर तुम्हाला थेट तुरूंगात जावे लागेल" असा मोठाच अपप्रचार करण्यात आला.** परिणामी संयुक्त चिकित्सा समितीवर हजारो सूचनांचा 'संघटीत' मारा करण्यात आला. त्यामुळे वातावरण कारण नसतांना खूपच बिघडले.

**१५.** या बिघडलेल्या वातावरणामध्ये बाहेर मंत्र्यांच्या स्तरावर हे वातावरण दुरुस्त करण्यासाठी होणाऱ्या चर्चांमध्ये सहभागी होतांना अत्यंत संयमित वर्तन, संतुलीत युक्तीवाद, आपले समजावून सांगण्यापेक्षा दुसऱ्याचे समजावून घेण्याची वृत्ती, शांतपणे पण बुद्धीमत्तापूर्ण युक्तीवाद करण्याचे असामान्य कौशल्य, या आधारावर दाभोळकरांनी फार मोठे यश मिळविले. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुळ उद्दीष्टांशी तडजोड न करता अनेक बदल करण्यास मान्यता दिली. विधेयकाचे मुळ लघुशीर्षक बदलवून ते **"जादूटोणा विरोधी विधेयक"** असे करण्यात आले. परिशिष्ट 'अ' मधील अपराधांची संख्या ५० वरून १२ पर्यंत खाली आणण्यात आली. **आज हे १२ अपराध नजरेखालून घातले तर त्यातील एकही अपराध हा अपराध नाही असे म्हणणाऱ्याला आपण काहीतरी अपराध करीत आहोत असे निश्चितपणे वाटल्याशिवाय राहणार नाही.** सारे मान्य झाले. मंत्र्यांनी/मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्या. पण प्रत्येक वेळी खेळखंडोबा करण्यात आला व कायदा अस्तित्वात आलाच नाही. असा विलंब लावणाऱ्या राज्यकर्त्यांना आपण काय करीत आहोत हे कळत नाही. समाजसुधारणांचे विवेकवादी कायदे करण्याच्या मागण्या येतात तेव्हा **शासनाने ठाम नकार दिला** तर अशा सुधारणांचे विरोधक "अब कुछ होनेवाला नही है" असे म्हणून स्वस्थ बसतात व सुधारणा समर्थकांना चळवळीचे सामर्थ्य वाढविण्यास बळ मिळते. शासनाने पाठींबा देऊन **तातडीने कायदा करून टाकला** तर अशा विधेयकांना विरोध करणारांची तार्किक बाजू इतकी लंगडी असते की तो विषय तेथेच संपून जातो. **तिसरी अवस्था ही अत्यंत वाईट अवस्था असते.** ज्या अवस्थेमध्ये शासन सामाजिक सुधारणांच्या अशा विधेयकांना सातत्त्याने पाठींबा जाहिर करीत राहते पण प्रत्यक्षात करीत मात्र काहीच नाही. सुधारणांच्या निष्ठावंत समर्थकांची विलंब होत असल्यामुळे करावयाच्या पाठपुराव्यात दमछाक होते. शासनाने आता मान्यच केले आहे, म्हणून समर्थकाचा फार मोठा समुह हा बेसावध व गाफिल अवस्थेत राहतो. अशा सामाजिक सुधारणामुळे ज्यांचे हितसंबध दुखावणार असे विरोधक प्रदिर्घ विलंबामुळे चेकाळले जातात. अठराअठरा वर्षे सामाजिक सुधारणेचा कायदा शासनाला मान्य असून अस्तित्वात येत नसेल तर सुधारणा विरोधकांना अतिरेकी व हिंसक कारवायांच्या योजना करण्यासाठी मुबलक वेळ मिळतो. हे राज्यकर्त्यांच्या लक्षात येवू नये हे मोठेच दुर्दैव होय.

**१६.** मी वर नमूद केल्याप्रमाणे व माझेशी फोन वरून बोलणे झाल्याप्रमाणे आपल्या सहकाऱ्यांशी फोनाफोनी करून डॉ. दाभोळकरांनी विधेयकाची प्रत माझेपर्यंत पोचविली व ती तशी पोचली आहे याची खात्री करुन घेतल्यानंतर मला एक तपशीलवार पत्र पाठविले. या पत्रात ते लिहितात :- **"प्रबोधनाने वा शिक्षणाने या अंधश्रद्धा जाण्यास वेळ लागणारच. तोपर्यंत यातील शोषण रोखण्यास कायदा हवा, आज पोलीस अधिकारीही या प्रकाराकडे ही आमच्याशी संबंधीत बाब नाही असे बघतात. कायद्यामुळे त्यांना या प्रकरणाची नेमकी व त्वरीत दखल घ्यावी लागेल."** डॉ. नरेंद्र दाभोळकर हे १९७० साली एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेले व्यवसायाने डॉक्टर असलेले व्यक्ती होते. याच पत्रात **"आरोग्यातील अधिक महत्वाचा भाग मानसिक आरोग्याचा आहे."** असे नमुद करुन पुढे ते म्हणतात **"याबाबतही सध्या कायदा नसल्याने पोलिस असमर्थता व्यक्त करतात. कार्यकर्ते हतबल ठरतात. यासाठी कायदा हवा." कायद्याची आवश्यकता का आहे?** याबाबतचे त्यांचे विचार वाचले म्हणजे वैचारिक उंचीच्या कोणत्या स्तरावरून ते या सर्व बाबीकडे पाहत होते हे लक्षात यायला वेळ लागत नाही. **"पार्वती माँ प्रकरणात तर असंख्य बायकांची विदारक फसवणूक झाली. अस्लम ब्रेडवाला देखील सहीसलामत निसटून गेला. त्यावरही कोणतीही कारवाई झाली नाही. थेट कायदा हे सर्व टाळू शकला असता."** असेही त्यांनी या पत्रात लिहिले आहे. विशेष बाब अशी की हे संपूर्ण पत्र स्वतःच्या हस्ताक्षरांत त्यांनी लिहून मला पाठविलेले आहे. एका जेष्ठ विचारवंताने लिहिलेले व काळजीपूर्वक जपून ठेवलेले हे संपूर्ण पत्र मी आज ***सहपत्र : तीन*** म्हणून सोबत दिले आहे. सती जाण्याची चाल स्वातंत्र्यापूर्वी कायद्याने बंद पडली नसती तर आजच्या सरकारने त्या सुधारणेला पाठिंबा दिला असता पण लोकांच्या भावना दुखावल्या जातात म्हणून चर्चेचे गुऱ्हाळ सुरुच ठेवले असते. **अस्लम ब्रेडवाल्याशी डॉक्टर दाभोळकरांचे काही वावरा धुऱ्याचे भांडण नव्हते. "बुडती हे जन न देखवे डोळा" अशा हृदयीचा तो आकांत होता,** हे कोणाच्याही लक्षात येईल. त्यांना त्यांचा देह या कारणी अर्पण करावा लागला तरी त्यांचा हा आकांत शासनाच्या लक्षात आला नाही. खिन्न मनाला आवरत एवढेच म्हणावेसे वाटते की "डॉक्टरसाहेब! 'आधुनिक' महाराष्ट्राला क्षमा करा."

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **01.09.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

To,..........................................................

..........................................................

..........................................................

..........................................................

..........................................................